e-ISSN No. 2394-8426
Special Issue On Scientific Research
Issue–I(IV), Volume–XII

# शिवकालीन महाराष्ट्राची सामाजिक रचना

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.
मो. नं. 99222 38998

**सारांश -**

मध्ययुगीन कालखंडाच्या अखेरच्या काळात महाराष्ट्रात राजकीय स्वरूपाची क्रांती झाली. त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात म्हणजे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनावर झाला. याला महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक रचना, भक्ति परंपरेचा, समन्वयवादी धोरणाचा विचार, महाराष्ट्राची स्वतंत्र विचारसरणी इत्यादी घटकांपासून ते महाराष्ट्र धर्मापर्यंत सर्वच घटना परिणामकारक ठरल्या. त्यामुळे महाराष्ट्राची नवी सामाजिक संस्कृती साकार होऊ शकली. शिवाजी महाराजांनी याच काळात महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची पायाभरणी करून भारताला 'स्वराज्याचा' पहिला धडा दिला. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य आकाराने खूप लहान असले तरीही ते संपूर्ण भारतामधील स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करीत असताना स्वराज्याचे रूपांतर सुराज्यामध्ये करण्याचे प्रयत्न केले. म्हणून महाराष्ट्रातील अठरा पगड जातींच्या लोकांना 'हिंदवी स्वराज्य' हे आपलेच स्वतःचे स्वराज्य वाटले. शिवकाळात स्वराज्यामध्ये अनेक जाती व पोटजाती असून त्यांच्यात कधी - कधी संघर्ष उद्भवला नाही. काही प्रकरणे सरकार दरबारी जात असत व चौकशी अंती निवाडा दिला जात असे. परंतु जातियतेवरून निवाडे न देता योग्य पडताळणी करून निवडा व्हायचा. स्वराज्यामध्ये जातीपेक्षा व्यक्तीला, त्यांच्या कार्याला महत्त्व दिले होते. हिंदवी स्वराज्याच्या जडण-घडणीसाठी बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार, गावकुसातील आणि गावकुसाबाहेरील प्रत्येक व्यक्ती शिवाजी महाराजांच्या पाठीशी उभे होते. त्यामुळेच शिवाजी महाराजांच्या हयातीमध्ये हिंदवी स्वराज्यात कधीही धार्मिक दंगल अथवा धार्मिक बंडखोरी न होता धार्मिक आणि सामाजिक सलोखा निर्माण झाला याचे वैशिष्ट्य म्हणजे शिवकालीन महाराष्ट्राची सामाजिक रचना.

**बिजशब्द -**

**जात** - भारतीय समाजातील स्थिर संस्था असून तिला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे.
**सलोखा** - समाजातील लोकांमध्ये असलेली एकता
**भटक्या जाती** - एका ठिकाणी स्थिर वस्ती करून न राहणारी जात.
**अस्पृश्य जाती** - समाजातील अतिशूद्र म्हणून गणली गेलेली जात.
**महारवडा** - गावातील अतिशूद्र म्हणून गणल्या गेलेली अस्पृश्य जातीच्या राहण्याची वस्ती. अस्पृश्य समाजातील महार ही पोटजात आहे.

## विषय विवेचन -

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On Scientific Research
Issue–I(IV), Volume–XII

महाराष्ट्राची सामाजिक संस्कृतीच पुढे भारतीय नव्या सामाजिक व्यवस्थेचा प्रोदशिक आविष्कार बनली. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या समाजात यादव काळातील सामाजिक संस्कृतीचा प्रभाव दीर्घकाळ टिकून राहिला. यादवकालीन संस्कृती वैदिक परंपरेचा वारसा सांगणारी, यज्ञप्रयोग हा या संस्कृतीचा पाया, कला व स्थापत्यशास्त्राची विविध वैशिष्ट्ये, इतर धर्मीयांचे अस्तित्व, विविध पंथांचा उदय व विकास, हिंदू धर्मातील विविध देवता, व्रते, सण व उत्सव परंपरा, संस्कार घटक विद्या व शैक्षणिक केंद्रे अशा विविध सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी युक्त असणारी ही संस्कृती समाजात लोकजागृतीची लाट निर्माण करणारी ठरली. याच संस्कृतीची तत्त्वे मराठाकालीन सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. मराठेकालीन सामाजिक जीवन विकसित करणारे घटक म्हणजे समाजजीवन, संस्कृती वारसा, लोककला व त्यांची स्थिती, मराठी भाषा, साहित्य रचना, पोवाडा, लावणी, तमाशा, कला, शिल्पकला व स्थापत्य कला, सण व उत्सवांची परंपरा व स्थिती, लोकजीवन व राहणीमान या घटकांमुळेच समाजात बरेच बदल होऊन जीवन परिपूर्ण बनले होते.

भारतीय इतिहासाच्या प्रारंभापासून भारतात 'यथा राजा तथा प्रजा' हा अलिखित नियम कटाक्षाने पाळला जात होता. 'राजाचा जो धर्म असेल तो प्रजेचा धर्म' मानला जात होता. शिवाजी महाराजांच्या कार्यकाळातमध्ये भारतात मुस्लिम राजकर्त्यांच्या अनेक राजवटी होत्या, आम्यात मुघलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, बिदरची बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही तसेच स्थानिक सत्ता अशा अनेक मुस्लिम राजेशाही त्या प्रांतात कमी अधिक मुस्लिम प्रजेला झुकते माप दिले जात होते. इ.स. 1610 मध्ये मसूरच्या पाटीलकीवरून बापाजी मुसलमान व नरसोजी जगदाळे यांच्यात वाद निर्माण झाला. तेव्हा तत्कालिन न्याय निवाड्यात ''नरसोजी जगदाळे यांचेच गळा पडोन त्यास कष्ट केले, वतनास विक्षेप केलास, ऐसा तू गुन्हेगार, तुला देहांत प्रायश्चित द्यावे, परंतु मुसलमानाची पातशाही तुही मुसलमान क्षमा जाली'' असा उल्लेख आढळतो. शहाजहान याने जानेवारी 1633 मध्ये एक आदेश काढून आपल्या साम्राज्यामध्ये नविन मंदिराच्या निर्मितीवर व जुन्या मंदिराच्या दुरूस्तीवर बंदी घातली. औरंगजेबाने ही हेच धोरण चालू ठेवले. याशिवाय त्याने मुसलमानांना सरकारी नोकरीमध्ये प्राथमिकता देण्याचे धोरण अंगिकारलेले होते. इ. स. 1667 मध्ये चार पोलीस अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले. परंतु त्यांनी इस्लाम धर्म स्विकारताच त्यांना पुन्हा त्यांच्या पदावर नियुक्त करण्यात आले. तसेच आग्र्याच्या भेटीवेळी अडकलेले वीर नेताजी पालकर ह्यांना औरंगजेबाने धर्मांतराची अट घालून जीवदान दिले होते व धर्मांतर करून घेतले होते. परंतु तेथून सुटून आल्यानंतर शिवाजी महाराजानी वीर नेताजी पालकर ह्यांना काही मोजक्या धर्मवेड्याच्या (ब्राम्हण) कारणामुळे धार्मिक विधी करून स्वराज्यात घ्यावे लागले. स्वतः शिवाजी महाराजांना देखील काही ब्राम्हणांनी मंदिर प्रवेश नाकारून धर्माच्या बंधनात अडकवले होते. तसेच स्वराज्य रक्षक, धर्मयोद्धा म्हणून जगात प्रसिद्ध असणारे स्वराज्याचे दुसरे छत्रपती, शिवाजी महाराजांचे जेष्ठ पुत्र छत्रपती संभाजीराजे ह्यांना देखील अखेरच्या वेळी औरंगजेबाने मुस्लिम धर्म स्वीकारल्यास माफ करतो, अशी विचारणा केली होती. परंतु छत्रपती संभाजीराजे त्यांनी कधीच मागणी मान्य केली नाही. ह्या सर्व उदाहरणावरून मुस्लिम राजकर्त्यांच्या राजवटीमध्ये हिंदुना कशा पध्दतीने वागवले जात होते, याची कल्पना येते.

## शिवकालीन महाराष्ट्राची सामाजिक रचना -

मध्ययुगीन मुस्लिम कालखंडात प्रचलित जातीसंस्थेवर फार मोठ्या प्रमाणात आघात झाले; परिणामी मोठ्या प्रमाणात धर्मांतरे झाली. एतद्देशीय राजघराण्यांनी प्रचलित जातीसंस्थेस पाठिंबा देण्याचे धोरण अनुसरले. शिवाजी महाराज सुद्धा या नियमास अपवाद नव्हते. वर्णव्यवस्था ही समाजामध्ये पूर्णपणे रूजली व त्यातूनच

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On Scientific Research
Issue–I(IV), Volume–XII

जातिसंस्थेचा वृक्ष फोफावला. आपआपसातील अन्नोदक संसर्ग, असंगसंगती पंक्तीपावनत्व इ. समस्या व त्यावरून झालेले संघर्ष मराठेकालीन जातीव्यवस्थेमध्ये होत. शिवकाळामध्ये समाजात अनेक जाती व जमाती अस्तित्वात होत्या. समाजाची रचना ही वर्ण व्यवस्थेवर आधारलेली होती. त्यापुढीलप्रमाणे आहेत.

**1. ब्राम्हण -**

प्राचीन काळापासून ब्राम्हणाची पटकर्मे शास्त्राने नेमून दिलेली आहेत, या सहा कर्तव्यामध्ये अध्ययन, युजन (यज्ञ), याजन (यज्ञकर्म करणारा किंवा यज्ञकर्ता) अध्यापन, दान व प्रतिग्रह (अनुग्रह) यांचा समावेश होता. ब्राम्हण स्वतः वेदशास्त्रे शिकून दुसऱ्यांना शिकवित असे. मराठा काळात अध्ययन, अध्यापन आणि दान व प्रतिग्रह यांना विशेष महत्व प्राप्त झाले. लिहिण्या वाचण्याच्या कामात ब्राम्हण तज्ज्ञ असल्यामुळे स्वाभाविक शिवकाळात त्यांना कारकुनाची कामे मिळत गेली व त्यामधूनच ते हळूहळू अधिकार पदावर गेले.
ब्राम्हण उपजातीमध्येही स्थान परत्वे श्रेष्ठत्वासाठी वाद होते. यापैकी एक वाद म्हणजे चित्तपावन-कऱ्हाडे विरुद्ध देवरूखे ब्राम्हण होय. कऱ्हाडे ब्राम्हणास चित्तपावन ब्राम्हणांनी पंक्तीत घेणे किंवा त्यांच्याशी बेटी व्यवहार करणे कमीपणाचे वाटत होते. क्रमवंत व चित्तपावन यांच्यामध्येही असाच वाद होता. ब्राम्हणामध्ये भिक्षुकी व्यवसाय करणारा एक फार मोठा वर्ग होता. त्यांच्यामध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी, तैतरीय, वाजसेनीय अशा प्रकारचे पोटभेद होते. त्याच्यामध्ये मोठेपणासाठी स्पर्धा असून, त्यासाठी सतत संघर्ष होत असे. त्यांच्या संघर्षाचा इतरांनाही त्रास होत राज्यकर्त्यांपर्यंत जात असत व राज्यकर्त्यांना हस्तक्षेप करून या प्रकरणांना आवर घालावा लागत असे.

**2. मराठा -**

ब्राम्हणांच्या नंतर समाजात क्षत्रियांचे स्थान होते. 96 कुळीचे मराठे स्वतःला क्षत्रिय समजत असत. शिवाजी महाराजांने त्यांचे क्षत्रियत्व सिद्ध केल्याने, नंतरच्या क्षत्रियांना म्हणजेच मराठ्यांना समाजामध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले होते. मराठ्यामध्ये मराठे व कुणबी अशा दोन प्रमुख शाखा होत्या. या दोघामध्ये सामाजिकदृष्ट्या मोठी तफावत होती. त्यांच्यामध्ये क्वचित प्रसंगी कन्यादान होत असे. कारण मराठे स्वतःला कुणबीहून श्रेष्ठ समजत असत. मराठे राज्यकर्ते असल्याने वतनदार होते. त्यांनाच देशमुख, देसाई इ. बहुमानात्कम नावाने ओळखले जात असे.
कुणबी हे गरीब शेतकरी किंवा शेतमजूर होते. कुणब्यामध्ये ही देशस्त व कोकणस्त असे दोन प्रमुख गट होते. याशिवाय तिरोळे, मन्वा आदी पोटभेदही होते. शेतीशिवाय सैन्यभरती, गोपालन व शेतमजुरी हे उद्योग त्यांना करावे लागत असत.

**3. इतर जाती व जमाती -**

ब्राम्हण, क्षत्रिय या प्रमुख जातीशिवाय स्वराज्यात इतर जाती व जमाती अस्तित्वात होत्या. त्यामध्ये कुंभार, सोनार, सुतार, शिंपी, धनगर, तेली, न्हावी, माळी, गोंधळी व गुरव इ. मुख्य होत्या. यापैकी काही बलुतेदार असल्याने त्यांना विशेष हक्क प्राप्त झाले होते. या मुख्य जाती-जमातीमध्येही उपजाती निर्माण झाल्या होत्या. कुंभारामध्ये मराठे कुंभार, गुजराथी कुंभार, कोकणी राजा, लाड किंवा थोरचाके, अहिर किंवा लहान चाके,

लिंगायत कुंभार इ. डझनभर पोटजाती होत्या. त्यांच्यामध्येही अनेक कारणावरून संघर्ष होत होता. सुतारामध्ये दोन प्रमुख पोटजाती असून ग्रामव्यवस्थेत सुतारांना अतिशय महत्व असल्याने, त्यांना काही ठिकाणी राजे म्हटले जात होते. न्हाव्यामध्ये वाजंत्री व मशालजी अशा दोन मुख्य जाती होत्या. खेडयातील किंवा शहरातील मंदिरातील पुजारी सर्वसामान्यपणे गुरव असे. त्यांच्यातही डझनभर पोटजाती होत्या. तेल्यामध्ये एक बैल तेली, दो बैल तेली अशा दोन मुख्य पोटजाती होत्या. शिंप्यामध्ये नामदेव शिंपी, भावसार शिंपी, मराठा शिंपी, अहिर शिंपी या पोटजाती होत्या. सोनार आपणास इतर पांचाळ (स्नानसंध्यादी पंचकर्मे करणारे) जमातीहून श्रेष्ठ समजत असल्याने, त्यांचा सुताराशी नित्य संघर्ष होत असे. माळ्यामध्ये फुलमाळी, जिरेमाळी, हळदेमाळी असे त्यांच्या उत्त्पादनानुसार पोटभेद होते. धनगरामध्ये हटकर व खुटकर अशा दोन प्रमुख उपजाती होत्या. हटकर म्हणजे मेंढपाळ किंवा मेंढ्के आणि खुटकर म्हणजे लोकरीपासून धोंगडी विणणारे. हटकर मेंढ्या घेऊन देशभर भटकत असत, तर खुटकर एका जागी स्थिर असत. गोंधळ्यामध्ये ब्राम्हण गोंधळी, मराठे गोंधळी, कुंभार गोंधळी इ. उपप्रकार होते. या उपजाती शिवाय लोहार, कोळी, साळी, सनगर, तांबोळी, ठाकूर, गोसावी, कोष्टी, कलावंत इ. शुद्र जातीही महाराष्ट्रात अस्तित्वात होत्या.

**4. भटक्या व विमुक्त जमाती -**

शिवकालीन महाराष्ट्रात वरील जाती-जमातीशिवाय बुडार, बेलदार, कैकाडी, बुरूड, पारधी या भटक्या व विमुक्त जमातीही गावगाड्याबाहेर वस्ती करून राहात आणि आपल्या कुवतीनुसार ते गावगाडयातील आपला वाटा उचलीत असत. या जमाती गावात काही काळच स्थिर राहत असत. याशिवाय खेड्याला नियमित वेळी भेट देणाऱ्या भटक्या जमातीही असत. हे फिरस्ते शक्यतो सुगीच्या दिवसात शेतकऱ्याला लागणारा माल घेऊन ठराविक खेड्यांना भेट देत असत. त्यामध्ये घीसाडी, बेलदार, वंजारी, लमाण, वैदू, गोंड, मांग, गारूडी, वासुदेव किंवा गोपाळ, कोल्हाटी, दरवेशी, गारोडी, माकडवाले, नंदीबैल वाले, चित्रकथी, बहुरूपी, रायनंद, भोप्ये, भगत, भुत्ये, आराधी, वाघ्या मुरळी, पांगुळ, बाळसंतोष, कानफाटे, उदासी, गोसावी इ. चा समावेश होता. यातील काही जमाती शेतकऱ्यास मदत करीत असत तर काही त्याचे हरप्रकारे मनोरंजन करून पोटास दाणागोटा मागून घेत असत. एकंदर सर्व व्यवहार परस्पर समजुतीने होत असून समाजातील बिघाड त्वरित दुरूस्त करण्याकडे सर्वांचा कल असे. राज्यकर्त्यांचा दृष्टिकोणही याला पोषक असे.

**5. अस्पृश्य जाती** -

अस्पृशांनाच अतिशुद्र म्हटले जात होते. अतिशुद्रामध्ये महार, मांग, चांभार, ढोर या प्रमुख जाती होत्या.

**1. महार -**

तत्कालीन काळात **'गाव तेथे महारवडा'** असा वाक्प्रचार अस्तित्वात होता. यावरून महाराचे समाजातील स्थान स्पष्ट होते. गावगाडयातील सर्वसाक्षी असा महत्वाचा बलुतेदार म्हणजे महार, गावकीचा शेतसारा वसूल करण्यापासून ते झाडलोटीपर्यंतची सर्व प्रकारची लहान-मोठी कामे करणे हे महाराचे मुख्य कर्तव्य, म्हणून जमिनीच्या सर्व तंट्यात महाराच्या साक्षीला अतिशय महत्व होते. कष्टाच्या, मानाने त्याला मिळणारी भाकरी अपुरी होती. महारामध्ये सोमवंशी, लाडवन, आदवन, बावने, विणकर इ. पोटजाती होत्या, त्यांचेही मानपानावरून व वतनावरून संघर्ष होत असत.

**2. मांग -**

गावगाड्यातील महारानंतरची ही दुसरी अस्पृश्य जात म्हणजे मांग. मांगाला गावातील हीन कामे करावी लागत असत. यावरूनच त्याच्या पोटजाती निर्माण झालेल्या दिसतात. उदा. घोडके - घोड्याची देखभाल करणारे, इफके - डफ किंवा हलगी तयार करणारे, पाठारी - लुटूर, मांग गारूडी - सापाचा खेळ करणारे, ड्रोलार - चामडे वाहणारे इ.

**3. चांभार -**

जनावरांच्या कातडीपासून भिन्न वस्तू बनविणे हा चांभाराचा मुख्य उद्योग होय. यांच्यापैकीच कातडी कमविण्याचे काम करणारे ते ढोर होत. विहिरीवरील मोटा बांधणे, हे ढोरांचे मुख्य काम होय. याशिवाय मोची व टिनगर या चांभाराच्या दोन पोटजाती होत्या. मोची जोडे, चपला तयार करीत तर टिनगर जोडे व खोगीर तयार करीत.

**6. इतर धर्मातील जाती-जमाती -**

हिंदू समाजाशिवाय महाराष्ट्रात शिवकाळात मुस्लिम, जैन, महानुभाव इ. धर्मांचे लोकही खेड्यापाड्यातून राहात होते. मुस्लिम वर्ग हा हिंदू समाजाचा एक अविभाज्य घटक झाला होता. त्यामुळेच भांड, मुलाणी, फकीर, सिद्दी, अत्तार, दरवेशी (अस्वलाचा खेळ करून दाखविणारे) यांना अलुते-बलुतेदारात स्थान प्राप्त झाले होते. मुस्लिमांच्या सणात हिंदू व हिंदूच्या सणात मुसलमान आनंदाने सहभागी होत असत. गावातील कापड दुकानदार व किराणा-भुसारवाले बहुतेक जैन असल्याचे आढळते. त्यामुळे जैन धर्मीय हिंदू धर्माचा एक भाग म्हणूनच वावरत होते. महानुभव मात्र स्वतःला वेगळे समजत असत. त्यामुळे त्यांचे व समाजाचे फारसे जमले नाही. म्हणून महानुभावांना जवळ जवळ वाळीत टाकल्याचे दिसते. लिंगायत धर्म वेगळा असला तरी तो हिंदू समाजाचाच एक घटक होता. त्यामुळेच लिंगायतांचा गुरू जंगम याला बलुतेदारात स्थान प्राप्त झाले होते.
वरील सर्व जाती व पोटजातिशिवाय समाजामध्ये या प्रत्येक जातिअंतर्गत कडू व गोड किंवा उच्च असे भेद होते. कडू व गोड यांच्यात बेटी व्यवहार होत नसत. तसेच त्यांच्यामध्ये मानपानावरून कधी कधी संघर्ष होत असे. हा संघर्ष **गोतसभा** सोडवित असे. तथापी त्याला राजमान्यतेची आवश्यकता होती. त्यामुळे शिवकाळात यातील अनेक कागदपत्रे प्रचलित जातीय संघर्षावर प्रकाश टाकतात. संघर्ष नाही अशी जात सापडणे कठीण होते. ब्राम्हणापासून ते शूद्र व अतिशुद्रापर्यंत सर्व जातीत कमी अधिक प्रमाणात अशा प्रकारचा संघर्ष होता. हे संघर्ष जातीच्या श्रेष्ठत्वावरून निर्माण झाले होते. चालीरीती व व्यवसाय यावरूनही अनेक संघर्ष उद्भवल्याचे आढळते. जाती - पोटजातीमधील चालीरीती अतिशय कठोर होत्या. क्वचित प्रसंगी त्या मोडल्या जात असत. तेव्हा गुन्हेगारास शिक्षा झाली पाहिजे असा समाजाचा दंडक असे.

**निष्कर्ष -**

1. शिवाजी महाराज यांनी कधीच धर्माचं सोंग घेतलं नाही किंबहुना कोणालाही कोणत्याही जातीमध्ये धर्मांतर करण्यावर बंधन घातले नाही.
2. शिवाजी महाराज हे एक हिंदू राजे असताना देखील त्यांनी स्वराज्याचा अधिकृत धर्म म्हणून हिंदू धर्मांना श्रेष्ठत्व बहाल केले नाही.
3. त्यांनी स्वराज्यात बळजबरीने कुणावर हिंदू धर्म स्वीकारण्यास बंधने बळजबरी केली नाही उलट त्यांना त्यांच्या धर्मांमध्येच राहूनच स्वधर्म पाळण्याला स्वतंत्र दिले.
4. हिंदू धर्मातील जे लोक बळजबरीने मुस्लिम धर्मात धर्मांतरीत झाले होते त्यांची ईच्छा म्हणून त्यांना परत हिंदू धर्मामध्ये सामावून घेतले.
5. 'गाव तेथे महारवडा' अशी स्थिती तत्कालीन काळात असताना देखील शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा कार्यांत महारांना सेवेची संधी देवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.
6. जाती धर्मावरून स्वराज्यात कधीही कोणाला डावलले गेले नाही. स्वराज्यात कर्तुत्वाला आणि स्वराज्याप्रती निष्ठेला महत्त्व दिले.
7. शिवाजी महाराजांच्या या सर्वधर्म समभाव विषयक धोरणामुळे आज एकविसाव्या शतकात देखील सर्व जाती धर्मातील लोकांसाठी शिवाजी महाराज आदरणीय, वंदनीय आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. काळे म. वा. - मराठ्यांचा इतिहास, प्राची प्रकाशन, मुंबई, 1918.
2. कुलकर्णी अ.रा - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथामावृत्ती 1993.
3. राऊत, गणेश - छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती 2013.
4. सरकार, यदुनाथ ; (अनु.) वाकसकर, विनायक सदाशिव - शिवाजी व शिवकाल, प्रकाशन, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, 1930.
5. सरदेसाई गो.स., - मराठी रियासत, खंड 1, पॉपुलर प्रकाशन, मुंबई 1935.
6. सहस्त्रबुद्धे, पु. ग. महाराष्ट्र संस्कृती, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, 2003.

***